महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
कोल्हापूर विभागीय मंडळ , कोल्हापूर -४१६ ००४.
Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education,
Kolhapur Divisional Board, Rajendranagar, Kolhapur-416 004

**Phones: Chairman** 2690829 [O] 2656044 [R]
**PBX** – [0231] 2696101, 2696102, 2696103
**E-Mail:** divsec.kop@gmail.com

**Secretary** 2691405[O] 2324079 [R].
**FAX:** [0231] 2690758
**Website :** sscboardkolhapur.in

**महत्वाचे**

क्र.कोविमं/भांडार/ 2730
दिनांक १४/०२/२०२२

प्रति,
सर्व केंद्रसंचालक / संबंधित परीक्षा केंद्राचे प्राचार्य/मुख्याध्यापक
उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२२
सातारा/ सांगली / कोल्हापूर.

विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) मार्च २०२२ परीक्षाकरीता लागणारे आवश्यक साहित्यबाबत... (उत्तरपत्रिका, पुरवणी, नकाशा, होलोक्राफ्ट स्टिकर्स इत्यादी)

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) मार्च २०२२ च्या परीक्षेकरीता परीक्षा केंद्रासाठी आवश्यक असणारे स्टेशनरी साहित्य पत्रासोबत आपल्या परीक्षा केंद्रावर पुरवठा करण्यात येणार आहे.

या पत्राव्दारे आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) मार्च २०२२ ही परीक्षा कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक विद्यालय निहाय घेण्यात येणार असल्याने आपल्या परीक्षा केंद्रावर या कार्यालयामार्फत पुरवठा करण्यात येणारे परीक्षेकरीता आवश्यक असणारे साहित्य (उत्तरपत्रिका, पुरवणी, नकाशा, होलोक्राफ्ट स्टिकर्स इत्यादी) **०४ मार्च २०२२ पासून इ.१२ वी परीक्षा सुरु होणे पूर्वी सहा दिवस अगोदर आपल्या अधिनस्त उपकेंद्रांना साहित्य वाटप करण्यात यावे.सदरचे साहित्य उपकेंद्राना वाटप करताना आपल्या केंद्राच्या अखत्यारित येणाऱ्या उपकेंद्राची यादी देण्यात आलेली आहे त्यानुसार वाटप करण्यात यावे.**

सदरचे साहित्य सुस्थितीत पाठविणे ही आपली जबाबदारी असल्याने त्या दृष्टीने योग्य त्या उपाय योजना आपल्या स्तरावर कराव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास पाठवावा. परीक्षेसाठी आवश्यक लागणारे साहित्य केंद्रावर उतरुन घ्यावे, जे परीक्षा केंद्र/ शाळा/ क.महाविद्यालय सदरचे साहित्य उतरुन घेण्यास नकार देतील त्यांच्यावर मंडळ नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

(सत्यवान सोनवणे)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

**प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाही साठी**
**सर्व प्राचार्य/मुख्याध्यापक (सातारा/सांगली/कोल्हापूर) :- यांना कळविण्यात येते की,उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) मार्च २०२२ ही परीक्षा कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक विद्यालय निहाय घेण्यात येणार असल्याने परीक्षेसाठी लागणारे आवश्यक साहित्य आपले मुळ केंद्रावर पुरवठा करण्यात येणार आहे. तरी सदरचे साहित्य आपण मुळ केंद्रावरुन व्यवस्थित रित्या यादी प्रमाणे घेऊन जावयाचे आहे याची नोंद घ्यावी.**

D/P/STATIONARY COLLECTION 1 2